क्रमांक ९३३४९ /ह-२
महाराष्ट्र विधानमंडळ
सचिवालय,
विधान भवन, मुंबई
दिनांक 8 JUL 2026

# :: प रि प त्र क ::

**विषय :- मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामुल्य प्रवास) सुविधेकरिता Railway Coupon Management System (RCMS) ही आज्ञावली व ऑनलाईन कार्यपध्दती सुरू करण्याबाबत**

मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्यांना महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (रेल्वेने विनामुल्य प्रवास) नियम, १९६५ अन्वये रेल्वेने विनामुल्य प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून उक्त नियमातील तरतूद खालीलप्रमाणे आहे:-

नियम ८ (१) सचिवाने सदस्यास कुपन पुस्तक देण्यापुर्वी ज्या सदस्याला ते द्यावयाचे असेल त्याचे नांव त्या कुपन पुस्तकांवर लिहिले पाहिजे २) असे कोणतेही कुपन पुस्तक देण्यापुर्वी सचिव योग्य अशा एका प्रतिज्ञापत्रावर सदस्यांची रितसर सही घेईल.

आता सदरहू कामकाज Railway Coupon Management System (RCMS) आज्ञावली द्वारे ऑनलाईन (Online) पध्दतीने माहे सप्टेंबर, २०२६ पासून सुरू करण्यात येणार आहे.

तरी यापुढे (१) रेल्वे कुपन पुस्तकाची मागणी (Request) मा.सदस्यांच्या अधिकृत लॉगईनमधून (संसदीय आयुधे सादर करण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले) प्राप्त झाल्यानंतर अधिकृत स्वीय सहाय्यकाच्या ओळखपत्राची नोंद घेऊन मा.सदस्यांना कुपन पुस्तके वितरित करणे (२) वापर केलेल्या रेल्वे कुपनचा हिशेब घेणे इत्यादी कामकाज ऑनलाईन पध्दतीने उपरोक्त RCMS या आज्ञावलीद्वारे करण्यात येणार आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

डॉ.विलास आठवले
सचिव-३
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

प्रति : महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व विद्यमान सदस्य

D:\C-drive backup\d-1\2025\Railway Coupen online software\paripatrak.docx